मुक्तागिरी

# ‘संविधानाच्या स्वप्नातलं गाव’ला जेष्ठ स्वा.सै. कै.गंगाधर श्रावण आबक स्मृती पुरस्कार जाहीर; कवितासंग्रहास अकरावा पुरस्कार

सातारा : येथील रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी कॉलेजमधील मराठी विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ.सुभाष वाघमारे यांच्या ''संविधांनाच्या स्वप्नातलं गाव' या कवितासंग्रहास पुणे येथील कवी चंद्रकांत मोतीराम जोगदंड यांनी जेष्ठ स्वातंत्र्यसैनिक कै.गंगाधर श्रावण आबक स्मृती पुरस्कार देण्याचे जाहीर केले असून २९ मे २०२२ रोजी पुणे येथील मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स टिळक रोड पुणे येथे होणाऱ्या खुल्या कवी संमेलनात हा पुरस्कार त्यांना सन्मानपूर्वक दिला जाणार आहे. त्यांच्या या यशाबद्दल छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्राचार्य डॉ.विठ्ठल शिवणकर,शिवाजी ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ.श्रीपाल सबनीस,रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ.अनिल पाटील,कर्मवीर विद्या प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक प्राचार्य आर.के .शिंदे,ऑडीटर व सहसचिव प्राचार्य डॉ.शिवलिंग मेनकुदळे,प्रा. डॉ.बाबुराव उपाध्ये,उपप्राचार्य डॉ.अनिलकुमार वावरे,उपप्राचार्य डॉ.




रोशनआरा शेख,उपप्राचार्य डॉ.रामराजे माने देशमुख, शिवाजी विद्यापीठ मराठी विभागाचे प्रमुख प्रा.डॉ.रणधीर शिंदे, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे अध्यक्ष डॉ.प्रकाश दुकळे, शिविमचे माजी अध्यक्ष,डॉ.शिवकुमार सोनाळकर, प्रा.चंद्रकांत जडगे , पिंपरी चिंचवड येथील ओबीसी संघटनेचे कार्यकर्ते मा.प्रताप गुरव यांनी त्यांचे अभिनंदन केले.

प्रा.डॉ.सुभाष वाघमारे हे मुळचे



मळोली.ता.माळशिरस .जिल्हा सोलापूर या गावचे रहिवासी असून त्यांचे शिक्षण छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये झाले. त्यांनी गावी समता प्रतिष्ठान सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून सेवाभावी कार्यात योगदान दिले. ३१ वर्षे रयत शिक्षण संस्थेच्या विविध महाविद्यालयात मराठी विषयाचे प्राध्यापक म्हणून काम करताना त्यांनी विवेक वाहिनी सारख्या विधायक कार्य करणाऱ्या विकास उपक्रमात मोठे कार्य केले आहे. ५ जून २०२१ रोजी त्यांच्या संविधानाच्या स्वप्नातलं गाव या कवितासंग्रहाचे प्रकाशन ८९ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ.श्रीपाल सबनीस व रयत शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ.विठ्ठल शिवणकर यांच्या हस्ते झाले होते. या कविता संग्रहास वाचन संस्कृती प्रतिष्ठान चा राज्यस्तरीय समाज प्रबोधन पुरस्कार ,छत्रपती शिवाजी कॉलेजचा सर्जनशील साहित्य लेखन पुरस्कार,तसेच गारगोटी येथील न्यूज पेपर गंगाधर पुरस्कार तसेच तरवडी येथील सत्यशोधक दीनमित्रकार मुकुंदराव पाटील साहित्य पुरस्कार, शब्दकळा साहित्य संघ मंगळवेढा यांचा काव्य पुरस्कार,श्रीरामपूर येथील प्रकाश किरण पुरस्कार, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचा ललित साहित्य पुरस्कार, फलटण येथील उत्कृष्ट साहित्यसेवा पुरस्कार,जागतिक आंबेडकरवादी अकादमी नागपूर यांचा वामनदादा कर्डक पुरस्कार असे नऊ पुरस्कार मिळाले असून सृष्टी साहित्य पुरस्कार अकोला हा दहावा पुरस्कार जाहीर झाला आहेच,पण हा अकरावा जेष्ठ स्वातंत्र्यसैनिक कै. गंगाधर श्रावण आबक स्मृती पुरस्कार जाहीर झाला आहे. या यशाबद्दल साहित्यविश्व प्रकाशनचे प्रकाशक विक्रम शिंदे,डॉ.संजयकुमार सरगडे,तारुण्यवेध संघटनेचे विशाल पोखरकर,छत्रपती शिवाजी कॉलेजचा स्टाफ,समता प्रतिष्ठान सेवाभावी संस्थेचे कार्यकर्ते,भीमराव मोरे,तुकाराम लोखंडे, शिवाजी वाघमारे, डॉ.गोरख बनसोडे, फर्गुसन कॉलेजचे उपप्राचार्य डॉ.प्रकाश पवार, भिनवाडा कादंबरीचे लेखक बाळासाहेब कांबळे, प्रा.युवराज खरात, तुषार बोकेफोडे, रोहित आवळे, प्रा.डॉ.आर.ए.कुंभार सम्यक शाक्य रत्न,मळोली गावातील हितचिंतक ग्रामस्थ,महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे कार्यकर्ते,लुंबिनी संघ सातारा,शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ कोल्हापूर,शिक्षक हितकारणी संघटना पुणे,तसेच अनेक साहित्यिक इत्यादींनी त्यांचे अभिनंदन केले.

ग्रामपंच


powered by thoughtpad infotech